# जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

## सरळ सेवा भरती -२०१६

जाहीरात क्रमांक आस्था/कार्या-३/अ-१०/सीआर ११७/२०१६ दिनांक १ ऑगष्ट,२०१६

## तलाठी पद भरती.

तलाठी पदाकरीता खाली नमुद केलेल्या प्रवर्गातील उमेदवारांकडुन दिनांक २१ ऑगष्ट,२०१६ रोजी सायं.०५.४५ वाजेपर्यंत (ONLINE) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. Online व्यतीरिक्त अर्ज स्विकारले जाणार नाही. जाहीरात व अर्जाचा नमुना www.nagpur.nic.in व www.collectorngp.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्रं. | प्रवर्ग | पद संख्या | महिला | माजी सैनिक | अंश कालीन | खेळाडु | अपंग (अस्थिव्यंग) | समांतर आरक्षणा व्यती रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जमाती | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | वि.ज. (अ) | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ३ | भ.ज.(ब) | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ४ | भ.ज.(ड) | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ५ | इ.मा.व | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ६ | खुला | ०५ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| | एकुण | ११ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ |

**वर नमुद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात अतिरिक्त संवर्गातील उमेदवार किंवा इतर कारणामुळे उमेदवार उपलब्ध झाल्यास बदल (कमी जास्त) होण्याची शक्यता आहे.**

**वेतनश्रेणी :- तलाठी (५२००-२०२००/- ग्रेड वेतन - २४००/-)**

**१) पात्रतेच्या अटी व शर्ती**

**शैक्षणीक अर्हता**

१.१) संविधानिक विद्यापीठाची पदवी तसेच शासनाचे त्याच्याशी समतुल्य म्हणून जाहीर केलेली अन्य अर्हता.

१.२) निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर २ वर्षाच्या आत विहीत संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील अन्यथा सेवा समाप्त करण्यात येईल.

१.३.) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असावा. (पुरावा आवश्यक)

१.४) मागासवर्गीय उमेदवारांनी नजीकचे कालावधीतील सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जाती प्रमाणपत्र आवश्यक राहील.

अनु.जाती/अनु.जमाती प्रवर्गातील उमेदवाराशिवाय अन्य मागासवर्गीय उमेदवारांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे (२०१६-२०१७) प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१.५) महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

१.६) उमेदवाराचे वय दिनांक ३१ जुलै, २०१६ रोजी किमान १८ वर्ष पुर्ण व कमाल ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांकरीता ५ वर्षापर्यंत शिथील, ( माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रसत, महिला, अंशकालीन,खेळाडु स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य व १९९१चे जनगणना कर्मचारी यांना शिथील असलेली उच्चतम वयोमर्यादा लागु राहील.)

१.७) निवड होणा-या उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागु राहील.

२) परीक्षा शुल्क (फी)

| पदाचे नांव | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| तलाठी | रुपये २००/- | रुपये १००/- |

**माजी सैनिकांना आवेदन पत्र सादर करतांना शुल्क आकारल्या जाणार नाही.**

परीक्षा शुल्क जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, नागपूर यांचे नावाने **भारतीय स्टेट बँक** खाते क्रं.३३८७१८६२८४३ मध्ये चलान व्दारे बँकेत भरुन बँकेचा Transaction ID प्राप्त करावा. बँकेचे चालान भरल्याशिवाय उमेदवाराचा ऑनलाईन अर्ज स्विकृत होणार नाही याची नोंद घ्यावी. मुळ चालान प्रत स्वत:जवळ जपून ठेवावी.

३) महिला उमेदवारांकरीता :-

उन्नत व प्रगत व्यक्ती /कुटूंबातील मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्गीय, वि.ज.भ.ज. व वि.मा.प्र. महिला उमेदवारांना महिलासांठी ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

४) माजी सैनिक उमेदवारांसाठी :-

माजी सैनिक या संमातर आरक्षणातील पदाकरीता आवेदन पत्र सादर करतांना माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरीता पात्र उमेदवार असावा.

माजी सैनिक या समांतर आरक्षणाचा पुर्वी लाभ घेवून शासकीय सेवेत नोकरी स्विकारली असेल तर समांतर आरक्षणाचे लाभास पात्र राहणार नाही. मात्र तो केवळ वयाची सवलत घेण्यास पात्र राहील.

५) अंशकालीन पदवीधर उमेदवारांकरीता :-

अंशकालीन पदवीधर / पदवीकाधारक उमेदवारांनी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील अद्यावत नोंदणी केलेली असावी.

६) अपंग उमेदवारांकरीता :-

अपंग उमेदवारांकरीता अपंगत्वाचे जिल्हा शल्य चिकीत्सकाने दिलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (अपंगत्व ४०% किंवा त्यापेक्षा जास्त अपंग असलेली व्यक्ती) अस्थिव्यंग म्हणजे एका हाताने किंवा एका पायाने व्यंग असलेली व्यक्ती

अपंग व्यक्तीची निवड झाल्यानंतर नियुक्ती करण्यापुर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यक मंडळाने तो उमेदवार संबधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच नियुक्ती करण्यात येईल.

७) खेळाडु उमेदवारांकरीता :-

अ) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्रं.६८/क्रीयुसे-२, दिनांक ३०.४.२००५ मधील अ.क्रं.४(क) मध्ये विहीत केलेली अर्हता धारण करीत असलेल्या अत्युच्च्य गुणवत्ताधारक खेळाडु उमेदवारांनी त्याबाबतचे क्रिडा /खेळ विषयक प्रमाणपत्र धारक.

ब) प्रचलीत व मुख्य मान्यताप्राप्त खेळातील खेळाडुंना प्राधान्य देण्यात येईल.

८) निवड पध्दती :-

अ) तलाठी पदाकरीता पदवी ही कमीत कमी अहर्ता असल्यामुळे परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमीक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

ब) तलाठी पदाच्या लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. उमेदवार गुणवत्ता पात्र ठरण्यासाठी किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

ड) तलाठी पदाकरीता **रविवार दिनांक ११ सप्टेंबर,२०१६** रोजी मुख्यालयी लेखी परीक्षा घेण्यात येईल व त्यानंतर OMR पध्दतीने उत्तरपत्रिकांची तपासणी करुन निकाल संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

इ) उमेदवारांनी उत्तरे लिहीण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेनचा वापर करावयाचा आहे.

**९) अर्ज सादर करण्याबाबत आवश्यक सूचना :-**

९.१) उमेदवाराला कोणत्याही इंटरनेट कॅफे, नागपूर जिल्हातील / तहसिल कार्यालयातील सेतू केंद्रातून किंवा उपलब्ध असलेल्या कोणत्याही इंटरनेट सुविधा असलेल्या संगणकावरुन अर्ज भरता येईल. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथील नियंत्रण कक्षात देखील ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.

**उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार आहे. परीक्षेसाठी विहीत केलेला अर्ज www.nagpur.nic.in व www.collectorngp.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल. त्यावर असलेल्या अर्जात माहिती भरुन सादर करावा. प्रिंट आउट काढून घ्यावी व इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपून ठेवावा. उमेदवारांनी एक पासपोर्ट साईज फोटो व स्वाक्षरी स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावा.**

९.२) तलाठी पदाच्या लेखी परिक्षेकरीता पात्र / अपात्र उमेदवारांची **दिनांक २५ ऑगष्ट,२०१६** रोजी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यावर काही आक्षेप असल्यास **दिनांक २८ ऑगष्ट,२०१६** पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वत: उपस्थित होवून किंवा **collngpbharti2015@gmail.com** या ई-मेल आयडीवर आक्षेप नोंदवावे, विलंबाने प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही.

परीक्षा प्रवेशपत्र आपणास **www.nagpur.nic.in व www.collectorngp.in** या संकेत स्थळावर तलाठी या पदाकरीता **दिनांक ०५ सप्टेंबर,२०१६** पासून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्यास काही अडचण निर्माण झाल्यास तलाठी पदाकरीता **दिनांक १० सप्टेंबर,२०१६** रोजी जिल्हाधिकारी,नागपूर यांचे कार्यालयातील परीक्षा नियंत्रण कक्षातून प्रवेशपत्र उपलब्ध करुन देण्यात येईल. लेखी परीक्षेकरीता कोणत्याही परीस्थितीत प्रवेशपत्राशिवाय परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

९.३) परीक्षा प्रवेश व इतर परीक्षेविषयी माहीती ही **www.nagpur.nic.in** व **www.collectorngp.in** वर उपलब्ध राहील.

१०) उत्तरपत्रिकेची तपासणी OMR पध्दतीने करण्यात येणार आहे. त्यामुळे उत्तरपत्रिकेतील निवडलेली पर्यायी वर्तुळ फक्त काळया शाईच्या बॉल पेनने संपूर्णपणे छायांकित करणे आवश्यक राहील.

**११) अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्राच्या छाननी शिवाय परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यांत येत आहे. त्यामुळे उमेदवार परीक्षा पास झाल्यानंतर प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर तात्पुरती निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. केवळ परीक्षा पास झाल्यामुळे उमेदवारास कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवाराने संबधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करावा.**

१२) गुणानुक्रमे लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्राची तपासणीचे वेळी सादर करावयाचे दस्ताऐवज.

१) शैक्षणीक अर्हतेचे प्रमाणपत्र

२) वयासंबधी दाखला ( जन्माचा दाखल / शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र)

३) जातीचे प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र

...४....

४) अधिवास प्रमाणपत्र
५) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (विमुक्त जाती व भटक्या जमाती / इतर मागासवर्ग करीता आवश्यक ) सदर प्रमाणपत्र दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत वैध असणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अश्या उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही.
६) शासकीय / निमशासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिका-यांची मंजूरी घेतल्याचे प्रमाणपत्र.
७) समांतर आरक्षणा अंतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांना वर नमुद करण्यात आलेला दाखला या व्यतिरिक्त समांतर आरक्षणाविषयाचे प्रमाणपत्र.
८) सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्रं.प्र.अ.क्रं.१००५/प्र.क्रं.३६/०५/-अ, दिनांक २६.५.२००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे. नमूना जोडलेला आहे.
९) ऑनलाईन पध्दतीने उमेदवारांनी अर्ज सादर करतेवेळी वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र नसल्याचे निदर्शनास आल्यास तसेच अर्जात नमूद केलेली माहीती खोटी आढळल्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर त्यांना अपात्र ठरविण्यात येईल व त्यानंतर याबाबत उमेदवाराचा कोणत्याही प्रकारचा उजर ऐकून घेतला जाणार नाही.

१३) तलाठी पदाकरीता प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येणार नाही.

१४) उमेदवारांना लेखी परीक्षेकरीता स्वत:च्या खर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१५) या प्रक्रियेत बदल करण्याचा परीक्षा स्थगीत / रद्द करण्याचा अधिकार जिल्हा निवड समितीला राहील. वेळापत्रकात काही कारणाने बदल झाल्यास किंवा अन्य काही सूचना असल्यास त्याची माहीती सुचना फलकावर लावून www.nagpur.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

दिनांक :- १ ऑगष्ट,२०१६
स्थळ :- नागपूर

(सचिन कुर्वे)
अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती,
तथा जिल्हाधिकारी,नागपूर.

# प्रतिज्ञापत्र

मी याव्दारे शपथपुर्वक कथन करतो/करते की,अर्जात नमुद केलेली माहीती माझ्या माहीती नुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी/चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषीत केले जाईल आणि जर निवड / नेमणूक झाल्यास, माझी सेवा कोणतीही सूचना दिल्याविना समाप्त केली जाईल, याची मला जाणीव आहे.

मी याव्दारे शपथ पुर्वक कथन करतो/करते की, मला शासकीय सेवेकरीता अपात्र घोषीत केलेले नाही. मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही माझ्या विरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित नाही.

ठिकाण :-
दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी
(नाव व पत्ता )

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा
नमुना - अ

**प्रतिज्ञापन**

(नियम -४ पहा)

मी, श्री / श्रीमती /कुमारी ------------------------------श्री------------- यांचा/यांची मुलगा /मुलगी / पत्नी, वय ------ वर्ष, राहणार ---------------------- --------- याव्दारे असे जाहीर करतो / करते की,

१) मी, ---------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला --------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च,२००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------- आहे.( असल्यास, जन्म दिनांक नमूद करावे.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च,२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे सदर पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-
दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी